ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्री.अतिश दादासाहेब आखाडे,
ग्रामसेवक, ग्रामपंचायत भावडी ता.श्रीगोंदा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ २४८ /२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३७८/२०२३, दिनांक- २२/०५/२०२३.
२. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३ / १७८/ २०२४,दिनांक- १५/०४/२०२४.
३. सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.५२/२०२४, दिनांक- २०/०३/२०२५.
४.श्री अतिश दादासाहेब आखाडे,ग्रामसेवक ग्रामपंचायत भावडी,ता.श्रीगोंदा यांचा सेवा तपशिल
५.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२६१७२२/२६, दि.२५/०३/२०२६.
६.गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/४९१/२६,दि.२३/०४/२०२६ नुसार श्री आखाडे यांना ज्ञापन पोहोच दि.१७.०४.२०२६.
७. गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/६२८/२६,दि.२९/०५/२०२६
८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील कलम ४ (४)

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्री अतिश दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत भावडी ता.श्रीगोंदा त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री अतिश दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक यांचे गैरतर्वना विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्री अतिश दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०६ दोषारोपांपैकी ०६ दोषारोप विभागीय चौकशी मध्ये सिध्द झालेले आहेत. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री अतिश दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन व गैरव्यवहार करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (४) नुसार निम्न समय

श्रेणीत स्तरावर आणणे ही शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? या बाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०७ अन्वये श्री अतिश दादासाहेब आखाडे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत भावडी ता.श्रीगोंदा त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला नाही.

सबब, श्री अतिश दादासाहेब आखाडे, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत भावडी ता.श्रीगोंदा यांना देण्यात आलेल्या अंतिम कारणे दाखवा नोटीसमधील महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (४) नुसार नमुद केलेली सध्याचे पदाचे समयश्रेणीत मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२९०९०७०९ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-07-2026 16:35:35
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

श्री अतिश दादासाहेब आखाडे, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत भावडी ता.श्रीगोंदा
द्वारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती,श्रीरामपुर/पारनेर/श्रीगोंदा

२/-सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.